Progressive Education Society's

**Modern College of Arts, Science & Commerce**

Shivajinagar, Pune- 411005.

# MODLIB

*Library E-Bulletin*

VOL– 1, ISSUE– 7&8

DATE–1/3/2014

## अणुक्रमणिका

१. प्रास्ताविक

२. उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार

३. आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

४. सावित्रीबाई फुले जयंती

५. नवीन उपक्रम : पुस्तक लॅमिनेशन

६. ग्रंथालय कार्यसंस्कृतीला नवी दिशा व प्रेरणा देणारे वर्कशॉप





**MODLIB**
*Library E-Bulletin*
VOL– 1, ISSUE– 7&8
DATE–1/3/2014

## अणुक्रमणिका

१. प्रास्ताविक

२. उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार

३. आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

४. सावित्रीबाई फुले जयंती

५. नवीन उपक्रम : पुस्तक लॅमिनेशन

६. ग्रंथालय कार्यसंस्कृतीला नवी दिशा व प्रेरणा देणारे वर्कशॉप

# ❖ प्रास्ताविक ❖

या वर्षातील ई-बुलेटिन प्रसिद्ध करीत आहोत. जानेवारी व फेबुवारी २०१४ या दोन महिन्यात ग्रंथालयाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती या अंकातून आपल्याला होणार आहे.आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेन्द्र झुंजारराव यांना पुणे विद्यापीठाच्या ६५व्या वर्धापन दिनी मिळालेला "उत्कृष्ट प्राचार्य" पुरस्कार आणि ग्रंथपाल सौ. माधुरी दात्रे यांना पुणे नगर वाचन मंदिर यांच्या तर्फे मिळालेला या वर्षीचा "आदर्श ग्रंथपाल" पुरस्कार या दोन आनंददायी घटनांची नोंद या अंकात घेण्यात आली आहे. तसेच ग्रंथालयातर्फे साजरा केलेला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी घेतलेले पुस्तकांच्या लॅमिनेशनचे प्रशिक्षण व ग्रंथालयाने घेतलेली दोन दिवसीय कार्यशाळा इ. माहिती आपण या अंकात वाचणार आहात.

धन्यवाद!

**सौ.एम.एस.दात्रे**
**ग्रंथपाल.**

MODLIB
Library E-Bulletin
VOL– 1, ISSUE– 7&8
DATE–1/3/2014

# अभिनंदन!!!

## ❖ उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार — १०/२/२०१४

डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५.

आपल्या महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. राजेन्द्र झुंजारराव यांना पुणे विद्यापीठाच्या ६५ व्या वर्धापन दिनी “उत्कृष्ट प्राचार्य” पुरस्कार प्रदान करण्यात आला. माननीय प्राचार्यांच्या या यशाबद्दल सर्व कर्मचारी वर्ग त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.




## ❖ आदर्श ग्रंथपाल पुरस्कार — ७/२/२०१४

सौ. माधुरी दात्रे, ग्रंथपाल, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५.



आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. माधुरी दात्रे यांना ग्रंथालय क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल, पुणे नगर वाचन मंदिर या संस्थेतर्फे २०१४ या वर्षीचा “आदर्श ग्रंथपाल” हा ज्ञानकोशकार केतकर पुरस्कृत पुरस्कार देण्यात आला. ७ फेब्रुवारी २०१४ रोजी संस्थेच्या १६६व्या वर्धापन दिनी सिनेदिग्दर्शक राजदत्त यांच्या हस्ते हा पुरस्कार सौ. माधुरी दात्रे यांना प्रदान करण्यात आला.

## ❖ आदर्श सेवक पुरस्कार — २५ / १ / २०१४

गुरूवर्य शंकरराव कानेटकर दिना निमित्त आपल्या ग्रंथालयाचे कर्मचारी श्री.तानाजी जाधव यांना यावर्षीचा “ गुरूवर्य शंकरराव कानेटकर आदर्श सेवक पुरस्कार ” देण्यात आला.



## ❖ सावित्रीबाई फुले जयंती — ३ / १ / २०१४

सावित्रीबाई फुले या मराठी शिक्षण प्रसारक समाज सुधारक महिला होत्या. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती ज्योतिराव फुले यांच्यासह त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.३.१.२०१४ रोजी त्यांची १८३वी जयंती ग्रंथालयात साजरी करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. झुजांरराव यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या उपस्थितीत सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण केले.







## ❖ नवीन उपक्रम ः पुस्तक लॅमिनेशन — १ / १ / २०१४

ग्रंथालयात असणारी वाचनीय, दर्जेदार व किमती पुस्तके टिकण्याच्या दृष्टीने त्या पुस्तकांना लॅमिनेशन करण्याचे प्रशिक्षण ग्रंथालयातील परिचरांना देण्यात आले.त्यामुळे पुस्तके जास्त काळ चांगली दिसू व टिकू शकतील.





MODLIB
Library E-Bulletin
VOL– 1, ISSUE– 7&8
DATE–1/3/2014

## ❖ ग्रंथालय कार्यसंस्कृतीला नवी दिशा व प्रेरणा देणारे वर्कशॉप ५/२/२०१४

ग्रंथालयातील विविध सेवा विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने मिळाव्यात आणि ग्रंथसंदर्भ अधिकाधिक विद्यायार्थ्यांपर्यंत पोचावीत यासाठी ग्रंथालयातील सहाय्यक व परिचर कर्मचारी वर्ग हा सदोदित काम करत असतो. सोबत या ग्रंथालय सहाय्यकांना जर एखादी कार्यशाळा घेता आली तर याद्वारे ग्रंथालय, सेवा, विद्यार्थी व ग्रंथालय कर्मचारी यांच्यातला आपापसातला संवाद वाढेल; यातून ग्रंथालय अधिक चांगल्या पद्धतीने सेवा पुरवू शकेल या भूमिकेतून मॉडर्न महाविद्यालयाच्या, ग्रंथालय विभागाने २ दिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती.




दोन दिवस चाललेल्या या कार्यशाळेचा विषय सादरीकरण, प्रश्न-संवाद, अभिप्राय असं स्वरूप होतं. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्वच ग्रंथालयाशी संबंधित कर्मचाऱ्यांसाठी हा एक नवा अनुभव ठरला.

यात पहिल्या दिवशी मॉडर्न महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. अ. गो. गोसावी सरांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर "शैक्षणिक ग्रंथालयापुढील आव्हाने" या विषयावर गरवारे महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. वंदना शेलार यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. नंतर याच दिवशी "ग्रंथालयातील वाचन साहित्याचे प्रकार" या विषयावर मॉडर्न महाविद्यालयाचे सहाय्यक ग्रंथपाल श्री. हजारे सर यांनी त्यांचे विचार मांडले. पहिल्या दिवशीच्या कार्यशाळेचा शेवट पुस्तकांना लेबलस् लावणे, पाकिटे लावणे, कार्ड लिहिणे, लॅमिनेशन करणे इ. च्या प्रात्याक्षिकाने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुखदा पांडकर यांनी केले. पहिला दिवस असा संवाद, गप्पा, प्रात्याक्षिक अशा स्वरूपात सर्वांच्या उत्सफूर्त सहभागाने पार पडला.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या सत्राची सुरूवात ग्रंथालयातील कनिष्ठ लिपीक श्री. अमित सांळुके सरांनी 'ग्रंथालयातील नियम व त्यांची उपयुक्तता' या विषयावर व्याख्यान दिले आणि त्यासंबधी प्रशिक्षणार्थींशी चर्चा केली. नियम हे दर्शनी भागात लावावेत. नियम हे सर्वांचा विचार करून सर्वांच्या सोयीसाठीच, अधिक चांगली सेवा देता यायला हवी यासाठीच बनवले आहेत ही भूमिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याची गरज ग्रंथपाल सौ. दात्रे मॅडम यांनी व्यक्त केली. नियमामुळे नियम पाळण्याची सवय होते. वेळेवर पुस्तके घेण्याची तसेच वेळेवर पुस्तके परत करण्याचे बंधन या नियमाद्वारेच मिळते.

त्यामुळे नियम हे विद्यार्थ्यांमध्ये 'शिस्त' रूजवतात. फक्त ते नियमाकरिता नियम म्हणून खूप टोकाच्या भाषेत न सांगता ते सहकार्याने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचले तर ते त्यांना मनातून पटतात व विद्यार्थी नियम पाळतात असा अनुभवही मॅडमनी यावेळी व्यक्त केला. ग्रंथालयाच्या वेळा व नियम याबाबतच्या तक्रारीवर मत नोंदविताना सौ. दात्रे मॅडम म्हणाल्या की बराचसा प्रश्न हा विद्यार्थ्यांशी संवादाचा असतो. तेव्हा आपण सुसंवादाने या बाबीकडे बघितले तर विद्यार्थी व ग्रंथालय यात छान सुसंवादी, सौहार्दाचे संबंध निर्माण होतात. नव्या काळात पुस्तकांचे डिजीटाइझेशन होताना पुस्तके वाचली जाणार की नाही? या प्रश्नावर सौ. दात्रे मॅडम म्हणाल्या की येथे आपण ग्रंथालयाचा भाग म्हणून दृष्टिकोनात बदल करणे गरजेचे आहे. कारण शनिवारी आम्ही अवांतर वाचनासाठी पुस्तके ठेवतो, त्याला आतापर्यंत मिळणारा प्रतिसाद उत्सफूर्त आहे.

विद्यार्थ्यांच्या वाचनाची भूक प्रचंड आहे, फक्त आपण आपला दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. आपण वाचकापर्यंत पोहचण्यासाठी नवनवीन उपक्रम, कार्यशाळा आयोजित केल्या पाहिजेत. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतला एक महत्त्वाचा घटक आहे. तेव्हा ही जबाबदारी आपण सर्वांनी निभावली पाहिजे. प्रश्नोत्तर संवादादरम्यान ग्रंथालयाच्या कार्यशैलीबाबत बोलताना सौ. दात्रे मॅडम यांनी आपले अनुभव सांगितले. ग्रंथालयात कोणताही बदल करण्यासाठी आम्ही मिटिंग घेतो. त्यात सर्वांच्या मतांचा विचार केला जातो. सर्वांना निर्णयात सहभागी करून घेतलं जातं. यामुळे ठरविल्या गेलेल्या निर्णयाची अंमलबजावणी स्वयंप्रेरित असते. ग्रंथालयातील वेगवेगळया कामाची वाटणीही मिटिंग द्वारे करतो. यामुळे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यात आपापसातही सौहार्दाचे, स्नेहाचे संबंध राहतात. अशाप्रकारे आम्ही सर्वांना सोबत घेऊन काम करतो.

नव्या वर्षातील या कार्यशाळेमुळे ग्रंथालयाचा संघ अधिकाधिक चांगली सेवा देण्यास सज्ज झाला. याचबरोबर आपण आपल्या पातळीवर आपल्या क्षेत्राला चांगले योगदान देतोय, ही भावना, जाणीव समाधान देऊन जाणारी ठरली. या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. चौधरी सरांनी ग्रंथालयाचे अभिनंदन केले. ग्रंथालयाने नेहमीच नव्याचा आग्रह धरला आहे. नव्या कार्यशाळेचा हा उपक्रम शहरातील इतर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांसाठीही दीपस्तंभ ठरला. सहभागी सर्व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी ग्रंथालयाप्रती आभार व्यक्त केले.

दोन दिवस चालेल्या या कार्यशाळेला 'गेटटूगेदर कम संवाद व नवी दिशा' असे स्वरूप झाले व कार्यशाळेच्या संयोजिका सौ. दात्रे मॅडमही वर्कशॉपची उद्दिष्टे पूर्ण झाल्याचे पाहून आनंदी झाल्या. अशी ही कार्यशाळा नव्या वर्षात नवी उर्जा व नवी दिशा देऊन गेली.

शब्दांकन ः सदानंद टेळके.

## ❖ SHORT REPORT OF LIBRARY WORKSHOP

On 5th & 6th February 2014, two days training workshop for library support staff was organized by Library Department of Modern College of Arts, Science & Commerce, Shivajinagar, Pune 411005. This workshop was organized for library staff of all schools & Colleges working under Progressive Education Society.

The Objective of this workshop was to make participants aware of the new developments in the field of library science, take care of library resources and at the same time give better services to their readers. The topics accordingly were included in this workshop.

15 participants representing different schools & colleges of Progressive Education Society attended this workshop.

Dr. Vandana Shelar, Librarian Garware College was the chief guest of the workshop & Prof. A. G. Gosavi, Ex-Principal of the College was the chairman of the workshop. Dr. Shelar madam guided about the "Challenges before academic libraries." Vice- Principals, Library Committee Chairman & Registrar of the College were present for inaugural function.

Mrs. M. S. Datre, Shri. S. M. Hajare, Shri. Amit Saluke, talked on different topics such as digitization, Library resources, library rules etc. Practical session about book processing and hands on e-resources was also organized. Comparing of the programme was done by Mrs. Sukhada Pandkar. Shri. S. M. Hajare explained the objectives of the workshop and vote of thanks was given by Shri. A. S. Kakad.

**Progressive Education Society's**

**Modern College of Arts, Science & Commerce**
**Shivajinagar, Pune - 411005**
**Maharashtra, India**

Library Contact:

Phone: (020)2553 5927 Ext:228
E-mail: mcasclib@gmail.com
Visit Us: www.mcasclib.com/index.html

Previous Bulletin

THANK YOU!!!

TOP